## किरकोळ फौजदारी अर्ज क्र.४६६/२०२० मध्ये नि. १ खालील आदेश

०१. सदरचा अर्ज अर्जदार सईद अहेमद खान पि. समीउल्ला खान, रा. पलटन मोहल्ला, हिंगोली, ता.जि.हिंगोली यांनी महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नुसार त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद कार्यालय, हिंगोली येथे घेण्याचा आदेश मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, तो हिंगोली येथील कायमचा रहिवासी आहे. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे त्याचा जन्म दिनांक २८/०१/१९८७ रोजी त्यांचे रहाते घरी हिंगोली येथे झालेला आहे. परंतू, त्यांचे आईवडिलांना कायदयाचे अपुरे ज्ञान असल्यामुळे ते अर्जदाराच्या जन्माची नोंद नगर परिषद कार्यालय, हिंगोली ता.जि. हिंगोली येथे विहित वेळेत करू शकलेले नाही. आता अर्जदारास शासकीय कामासाठी त्यांच्या जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदाराने नगर परिषद कार्यालयाच्या दप्तरी त्यांच्या जन्माची नोंद घेण्याच्या आदेशास्तव प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. गैरअर्जदार मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांनी हजर होवून त्यांचे म्हणणे निशाणी ०८ वर दाखल केले. त्यात त्यांनी नमूद केले की, अर्जदाराचे जन्माची नोंद त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

०४. दै.देशोन्नती वृत्तपत्राच्या माध्यमातून हरकत व आक्षेप मागविले होते. सदर जाहिर प्रगटनाच्या अनुषंगाने प्रकरणात कोणीही हजर झाले नाही.

०५. अर्जातील कथने पाहता खालील मुददे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार त्यांच्या जन्माची नोंद घेण्याचा आदेश मिळविण्यास पात्र आहे काय ? | .. होय |
| २. | काय आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ :**

०६. अर्जदार सईद अहेमद खान पि. समीउल्ला खान यांनी त्यांचे स्वत:चे साक्षीचे शपथपत्र निशाणी ११ वर दाखल केले. याशिवाय अर्जदाराने सदर अर्जाच्या पुष्ठयर्थ नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांनी अर्जदाराचे जन्माची नोंद त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत दिलेले जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्राची प्रत निशाणी १२, दहावी सनदची प्रमाणित प्रत निशाणी १३, अर्जदाराचे आधारकार्डची प्रमाणित प्रत निशाणी १४, दै. देशोन्नती वृत्तपत्रामध्ये दिलेल्या जाहिरप्रगटनाची मूळप्रत निशाणी १५ व जिल्हा परिषद बहुविध प्रशाला, हिंगोली यांनी दिलेली टि.सी.ची छायांकित प्रत दाखल केली. अर्जदाराने पुरशिस दाखल करून आपला पुरावा बंद केला.

०७. अर्जदार सईद अहेमद खान पि. समीउल्ला खान यांनी त्यांचे सरतपासात कथन केले आहे की, त्यांचा जन्म दिनांक २८/०१/१९८७ रोजी त्यांचे रहाते घरी झालेला असून त्यांचे आईवडिलांना कायदयाचे अपुरे ज्ञान असल्यामुळे ते त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद कार्यालय, हिंगोली ता.जि. हिंगोली येथे विहित वेळेत करू शकलेले नाही. नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांनी दिलेले जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र निशाणी १२ वरून अर्जदाराच्या जन्माची नोंद त्यांच्या कार्यालयात नसल्याचे दिसून येते. दहावी सनदची प्रमाणित प्रत निशाणी १३ व जिल्हा परिषद बहुविध प्रशाला, हिंगोली

यांनी दिलेल्या टि.सी.ची छायांकित प्रत मध्ये अर्जदाराच्या जन्माची तारीख २८/०१/१९८७ अशी नमूद करण्यात आलेली आहे. याशिवाय दै. देशोन्नती वृत्तपत्रामध्ये दिनांक ०७/१२/२०२० रोजी जाहिर प्रगटन देवून देखील कोणीही हजर होवून अर्जास उजर घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचे जन्माची नोंद घेण्याचे संबंधीत कार्यालयास निर्देश दिल्यास संयुक्तीक होईल. अर्जातील तथ्यांवरून अर्जदाराच्या जन्माच्या तारखेची नोंद घेणे आवश्यक दिसते. महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियमातील तरतूदी नुसार अर्ज मंजूर करता येतो. अर्ज नमांजूर करण्यासाठी कोणतीही कारणे आजमितीस वाटत नाहीत. वरील चर्चेस अनुषंगून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ याद्वारे असे आदेशित करण्यात येते की, गैरअर्जदार यांनी अर्जदार सईद अहेमद खान पि. समीउल्ला खान यांच्या जन्माची तारीख २८/०१/१९८७ अशी नोंद त्यांच्या कार्यालयात हाताळण्यात येणा–या संबंधीत रजिस्टर मध्ये नियमाप्रमाणे शुल्क आकारून घ्यावी.

३ येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

Vivek Vithalrao Nivghekar
Digitally signed by Vivek Vithalrao Nivghekar
Date: 2021.01.25 15:58:17 +0530

( व्हि. व्हि. निवघेकर )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०१) हिंगोली.

दिनांक २५/०१/२०२१